## विषयसूची

卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ६

卐 मनोगत ८

## ग्रंथाची अनुक्रमणिका

१. धर्माचरण ८

२. धर्माचरणाचे पालटणारे रूप १२

३. धर्माचे स्वरूप कोणाला समजते ? १३

४. धर्माचे भविष्य १४

५. धर्म आणि भारताचे महत्त्व १५

६. धर्म आणि संस्कृती १८

७. धर्म आणि नीती २३

८. निरनिराळे पंथ आणि धर्म २६

९. धर्मग्लानी आणि अवतार ३२

१०. भारताच्या अवनतीची कारणे ३५

११. हिंदु धर्माचे रक्षण करणे, हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य असणे ! ३७

१२. धर्मराज्याची (हिंदु राष्ट्राची) स्थापना करणे, हे धर्मकर्तव्य ! ४२

卐 धर्मासंबंधी टीका किंवा अयोग्य विचार आणि त्यांचे खंडण ५१

卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ८४

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## मनोगत

‘समाजव्यवस्था उत्तम रहाणे, प्रत्येक प्राणीमात्राची ऐहिक आणि पारलौकिक उन्नती होणे, या गोष्टी ज्याच्यामुळे साध्य होतात तो धर्म’, अशी धर्माची व्याख्या आद्य शंकराचार्यांनी केली आहे. धर्म हा केवळ जाणून घेण्याचा विषय नाही, तर आचरणात आणण्याचा विषय आहे; कारण धर्माच्या आचरणानेच धर्माची अनुभूती येते. यासाठी प्रस्तूत ग्रंथात धर्माचरणाचे महत्त्व दिले आहे.

‘जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते, तेव्हा तेव्हा मी धर्मसंस्थापनेसाठी अवतार घेतो’, या भगवंताच्या वचनानुसार भगवंत धर्मसंस्थापना करणारच आहे; पण भगवंताने जेव्हा गोवर्धन पर्वत उचलला, तेव्हा गोपगोपींनी जशा त्या पर्वताला आपापल्या काठ्या लावल्या, तसे आपणही धर्मरक्षणाच्या कार्याला हातभार लावणे, हे काळानुसार आवश्यक धर्मपालनच आहे ! आज देवतांचे विडंबन, धर्मांतर, आतंकवाद, भ्रष्टाचार यांसारख्या समाज, राष्ट्र अन् धर्म यांवर ओढवलेल्या सर्व संकटांवरील एकमेव कायमस्वरूपी उपाय म्हणजे रामराज्याप्रमाणेच धर्मराज्याची स्थापना करणे! हे धर्मराज्य म्हणजेच धर्माच्या अधिष्ठानावर स्थापन करायचे ‘हिंदु राष्ट्र’ होय. धर्मरक्षण आणि धर्मराज्याची स्थापना यांविषयी सुबोध मार्गदर्शन या ग्रंथात केले आहे.

‘हा ग्रंथ वाचून प्रत्येकाच्या मनात धर्माप्रती प्रेम, श्रद्धा आणि अभिमान निर्माण होऊन धर्मरक्षणाच्या कार्यात तो सहभागी होवो’, अशी श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

**टीपा** १. ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

२. विषय पूर्ण होण्याच्या दृष्टीने ग्रंथात अन्य संदर्भग्रंथ, तसेच लेखन यांतून काही सूत्रे घेतली आहेत. अशा सूत्रांच्या अंती लहान अक्षरांत कंसात संदर्भक्रमांक घातले आहेत. त्याचे विवरण ग्रंथाच्या शेवटी ‘संदर्भसूची’मध्ये दिले आहे.